वर्ष २६ वे

अंक २ रा

सर्व सभासद / हितचिंतकांस आग्रहाचे निमंत्रण

# वार्षिक सर्वसाधारण सभा, स्नेह मेळावा, विद्यार्थी व ग्रामस्थ गौरव कार्यक्रम - निमंत्रण पत्रिका

-: कार्यक्रमाचे स्थळ :-

**इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनियर्स**

मॉडर्न कॅफे चौक, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००५.

**रविवार दि.२३.०८.२०२६ रोजी सकाळी १०.०० वा.**







# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

(रजि.नं. एफ/१४२७/पुणे, स्थापना : ०३.१२.१९७९)

**Website : http://www.parnermitramandalpune.com/**

यांचे मुखपत्र

# संवाद

## वसतिगृहाची वैशिष्ट्ये (मुलांचे)

- वाय-फाय सुविधा उपलब्ध.
- विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका.
- इमारतीचे एकूण क्षेत्रफळ १२३१०.०० चौ.फुट (४ मजले व पार्किंग).
- प्रत्येक मजल्यावर ८ खोल्या व २ सेल्फ कंटेन्ड खोल्या.
- खोलीचा आकार १०' x १४'
- सी.सी.टी.व्ही. कॅमेरे
- एकूण १६० विद्यार्थ्यांची सोय.

**ऑगस्ट २०२६**

फक्त सभासदांकरिता
(खाजगी वितरणासाठी)

## वसतिगृहाची वैशिष्ट्ये (मुलींचे)

- वाय-फाय सुविधा उपलब्ध.
- इमारतीचे एकूण क्षेत्रफळ २४००.०० चौ.फुट
- (३ मजले व पार्किंग).
- प्रत्येक मजल्यावर ३ खोल्या व १ सेल्फ कंटेन्ड खोली व १ स्वयंपाकघर.
- सी.सी.टी.व्ही. कॅमेरे
- एकूण २५ विद्यार्थिनींची सोय

# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

रजि.नं.एफ/१४२७/पुणे, स्थापना दि. ०३.१२.१९७९
स.नं.१७/४अ, मंगलनगर, गल्ली नं.८, वाकड रोड, थेरगाव, पुणे - ४११ ०३३.

## वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

( दिनांक : ८ ऑगस्ट, २०२६ )

पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा **रविवार दि.२३.०८.२०२६** रोजी सकाळी १०.३० वा. **इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनियर्स,** मॉडर्न कॅफे चौक, शिवाजीनगर, पुणे – ४११ ००५ येथे आयोजित केली असून सदर सभेचे कामकाज खालीलप्रमाणे होईल.

१) दि.२४.०८.२०२५ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेच्या कामकाजाचा लेखी अहवाल वाचून मंजूर करणे.
२) चार्टर्ड अकौंटंटकडून तपासून आलेल्या २०२५–२०२६ च्या जमाखर्चा संबंधीचा अहवाल वाचून मंजूर करणे.
३) सन २०२६–२०२७ साठीच्या अंदाजपत्रकास मान्यता देणे.
४) भावी कार्याची दिशा ठरविणे.
५) सन २०२६–२०२७ साठी लेखा तपासणीसाची नेमणूक करणे.
६) मा.अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळेचा विषय असल्यास त्याचा विचार करणे.

सूचना :-
१) माननीय सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे.
२) गणपूर्तीच्या अभावी सभा तहकूब झाल्यास त्याच दिवशी सकाळी ११.०० वाजता त्याच जागी ती सभा भरविण्यात येईल व वरील कामकाज पार पाडण्यात येईल.
३) वरील सभेत मांडण्यासाठी ठराव पाठवायचे असल्यास ते सूचक व अनूमोदक यांच्या पूर्ण नावासह आणि सह्यासह दि.१५.०८.२०२६ पर्यंत मिळतील असे पाठवावेत.

✦ आपले नम्र ✦

**हौसाराम घोडके** – आजीव अध्यक्ष
**सुनील पोटे** – अध्यक्ष
**किरण तिकोणे** – उपाध्यक्ष
**राजाराम मुंढे** – सेक्रेटरी
**गोरक्ष जगताप** – सह सेक्रेटरी
**प्रमोद जगदाळे** – कार्यवाहक
**अशोक वाबळे** – सहकार्यवाह

**सदस्य :– इंजि.डॉ.विजयकुमार ठुबे, डॉ.बाळासाहेब बांडे, मधुकर शिरोळे, बाजीराव जगदाळे, रामदास शिर्के, माधव गायके, सुनील निंबाळकर, सुनील कोल्हे, राजेश गागरे.**

✦ कार्यक्रमाचे स्थळ ✦

**इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनियर्स,**
मॉडर्न कॅफे चौक, शिवाजीनगर, पुणे – ४११ ००५.
**रविवार दि. २३.०८.२०२६ रोजी सकाळी १०.०० वा.**
**संपर्क – श्री. सुनील पोटे ९२२६९२१०८८**

# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

रजि.नं.एफ/१४२७/पुणे, स्थापना दि. ०३.१२.१९७९

स.नं.१७/४अ, मंगलनगर, गल्ली नं.८, वाकड रोड, थेरगाव, पुणे - ४११ ०३३.

## स्नेह मेळावा,
## विद्यार्थी व ग्रामस्थ गौरव कार्यक्रम

पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे या संस्थेचा **स्नेहमेळावा, विद्याथी व ग्रामस्थ गौरव कार्यक्रम रविवार दि.२३.०८.२०२६** रोजी सकाळी १०.०० वा. **इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनियर्स,** मॉडर्न कॅफे चौक, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००५ येथे खालील सन्माननियांच्या उपस्थितीत आयोजित केलेला आहे.

**अध्यक्ष**

**प्राचार्य ॲड. मच्छिंद्रनाथ मल्हारी तांबे,**

**प्राचार्य, मराठा विद्या प्रसारक संस्थेचे लॉ कॉलेज, अहिल्यानगर व सदस्य, महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग**

**प्रमुख पाहुणे**

**मा.अरुण चांगदेव कोल्हे,**

**सहसचिव व वित्तीय सल्लागार, आपत्ती, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई.**

तरी आपण अवश्य उपस्थित रहावे, हि विनंती.

आपले नम्र

**हौसाराम घोडके** – आजीव अध्यक्ष
**सुनील पोटे** – अध्यक्ष
**किरण तिकोणे** – उपाध्यक्ष
**राजाराम मुंढे** – सेक्रेटरी
**गोरक्ष जगताप** – सह सेक्रेटरी
**प्रमोद जगदाळे** – कार्यवाहक
**अशोक वाबळे** – सहकार्यवाह

**सदस्य :- इंजि.डॉ.विजयकुमार ठुबे, डॉ.बाळासाहेब बांडे, मधुकर शिरोळे, बाजीराव जगदाळे, रामदास शिर्के, माधव गायके, सुनील निंबाळकर, सुनील कोल्हे, राजेश गागरे.**

कार्यक्रमाचे स्थळ

**इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनियर्स,**

मॉडर्न कॅफे चौक, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००५.

**रविवार दि. २३.०८.२०२६ रोजी सकाळी १०.०० वा.**

**संपर्क - श्री. सुनील पोटे ९२२६९२१०८८**

कार्यक्रमानंतर स्नेहभोजनाचा आस्वाद घ्यावा ही विनंती.

# संपादकीय

प्रिय सभासद,

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी **दि. २३ ऑगस्ट २०२६** रोजी रविवारी पुणे येथील **इन्स्टिटयूट ऑफ इंजिनिअर्सच्या फिरोदिया हॉलमध्ये सकाळी ११ वाजता** आपल्या **पारनेर तालुका मित्र मंडळाचा 'स्नेहमेळावा, विद्यार्थी व ग्रामस्थ गौरव कार्यक्रम'** आयोजित केला आहे. या कार्यक्रमामध्ये विद्यार्थी व पालक यांना मार्गदर्शन करण्यासाठी आपल्या तालुक्यातील वरिष्ठ पातळीवरील अधिकारी **प्रा.ॲड.एम.एम.तांबे सर** व **शिवश्री अरूण कोल्हे सर** उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे आपण सर्वांनी सहपरिवार या कार्यक्रमामध्ये सहभाग घ्यावा व आपल्या तालुक्याविषयी प्रेमभाव दाखवून द्यावा, अशी मंडळाच्या कार्यकारिणीतर्फे विनंती करतो..

यावर्षी एल निनोच्या प्रभावामुळे पावसाचे प्रमाण कमी राहील अशी शक्यता वर्तवण्यात आली होती. तथापि पहिला पाऊस पेरणीसाठी समाधानकारक पडला, त्यामुळे शेतकरी वर्ग समाधानी आहे, असे मला वाटते. आपला तालुकाही शेतीप्रधान आहे. पर्जन्यमान कमी असले तरी आपले शेतकरी जोडधंदा करून शेती करतात. त्यामुळे आता राहणीमानही उंचावले आहे. त्यात शैक्षणिक क्षेत्रात आपल्या तालुक्यात विद्येच्या रत्नांची खाण असल्याने वैचारिक तसेच राहणीमानाचा दर्जा वाढला आहे. वस्त्यांवर व शेतात उभे राहिलेले रंगीबेरंगी बंगले पाहिले की त्याचा प्रत्यय येतो.

गेल्या चार महिन्यात मंडळाच्या कार्यभारावर विश्वास ठेवून **शिवश्री विश्वनाथ कोरडे, शिवश्री कुमुदिनी घोडके व शिवश्री प्रशांत आढाव** यांनी मंडळास भरघोस आर्थिक मदत केली आहे. या मान्यवरांच्या प्रती मी कृतज्ञता व्यक्त करतो. बऱ्याच सभासद व हितचिंतकांनी त्यांच्या पाल्यांच्या विवाहाप्रित्यर्थ मंडळास रूपये पाच हजार देणगी दिली आहे. त्यांचेही मी अभिनंदन करतो. अनेक सभासदांनी त्यांच्या क्षेत्रामध्ये दैदीप्यमान यश मिळविले आहे. त्यांचे यथोचित कौतुकही झाले आहे. विशेष करून निवृत्त वनाधिकारी **रामदास पुजारी** यांना **डॉ.बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय साहित्य पुरस्काराने** सन्मानित करण्यात आले; हे नमूद करताना मला अभिमान वाटतो. त्याचबरोबर **डॉ.ऋषिकेश खोडदे,डॉ.धनश्री चेमटे, डॉ.योग्यता पठारे व डॉ.नीता खोडदे** यांनाही त्यांच्या संशोधन क्षेत्रातील कार्याबद्दल **पी.एच.डी.** प्रदान करण्यात आली. **पारनेर तालुका हा अद्यापही विद्येच्या रत्नांची खाण आहे,** हे त्यांनी सिद्ध केले आहे.

आपल्या मंडळावर नेहमीच प्रेम करणारे **इंजि.वसंतराव पंदरकर सर** आपल्या एन.एच.ए.आय. मधील ४२ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेतून नुकतेच निवृत्त झाले आहे. त्यांना पुढील निरोगी आयुष्यासाठी शुभेच्छा व्यक्त करतो. राळेगण सिद्धी येथील **वयोवृद्ध सावळेराव पाटीलबा पठारे यांचे १०७** व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले तसेच आपल्या मंडळाच्या विद्यार्थी वसतिगृहाच्या व्यवस्थापनेची मनोभावे सेवा करणारे व्यवस्थापक **प्रमोद देशपांडे** यांचे अल्पशा आजाराने वयाच्या ७५ वर्षी नुकतेच निधन झाले. त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखामध्ये सर्व कार्यकारिणी सदस्य व मंडळाचे सभासद सामील आहेत. कै.पठारे बाबा व कै.देशपांडे यांना आदरांजली अर्पण करतो.

आपल्या विद्यार्थी व विद्यार्थिनी वसतिगृहाचे कामकाज अतिशय चांगल्या प्रकारे चालू आहे. ते अधिक चांगले चालू राहावे, यासाठी आपल्या सक्रिय सहभागाची आवश्यकता आहे; त्याची आपण पूर्तता करावी,
अशा अपेक्षेसह माझ्या संपादकीयास अर्धविराम देतो!

**जय जिजाऊ! जय शिवराय!!**

**इंजि.डॉ.विजयकुमार ठुबे**
**संपादक**

## पारनेर तालुका मित्रमंडळ, पुणे - कार्यकारिणी सदस्य

| | | |
|---|---|---|
| श्री.हौसाराम घोडके | आजीव अध्यक्ष | ९४२०६९६७९० |
| श्री.सुनील पोटे | अध्यक्ष | ९२२६९२१०८८ |
| श्री.किरण तिकोणे | उपाध्यक्ष | ९८२२३४६१३८ |
| श्री.राजाराम मुंढे | सेक्रेटरी | ९५२७४४५७५७ |
| प्रा.गोरक्ष जगताप | सहसेक्रेटरी | ९८६०९०७६१८ |
| श्री.प्रमोद जगदाळे | कार्यवाहक | ९५७९६७४८१७ |
| श्री.अशोक वाबळे | सहकार्यवाहक | ९८८१६०८३५७ |
| श्री.सुनील कोल्हे | सदस्य | ९९२२४३४९८६ |
| इंजि.विजयकुमार ठुबे | सदस्य | ९४२२०२६२२५ |
| डॉ.बाळासाहेब बांडे | सदस्य | ९८२२०५१५९३ |
| श्री.बाजीराव जगदाळे | सदस्य | ९०११०२१४३० |
| श्री.मधुकर शिरोळे | सदस्य | ९९२२१६६१२५ |
| श्री.रामदास शिर्के | सदस्य | ९४२२०१६७६४ |
| प्रा.सुनील निंबाळकर | सदस्य | ९४२२२२२०३० |
| प्रा.माधव गायके | सदस्य | ९८२२९९५०९७ |
| श्री.राजेश गागरे | सदस्य | ९७६६६२४२६५ |

## वसतिगृह प्रवेशासाठी सपर्क

**मुलींचे वसतिगृह, आळंदी रोड, साईबाबा मंदिराजवळ, पुणे**

**श्री.सुनील पोटे – ९२२६९२१०८८**

**श्री.बाजीराव जगदाळे – ९०११०२१४३०**

**मुलांचे वसतिगृह, डांगे चौक, पुणे**

श्री.दयानंद पतंगे – ९५७९८७०८३९

श्री.राजाराम मुंढे – ९५२७४४५७५७

# विद्यार्थी गौरव १० वी – २०२६


कु.शर्वरी संदिप जगताप, बाबुर्डी ९७.६%


विराज रविकिरण शेरकर, पारनेर ९७.४%


कु. साची सचिन पोळ, जामगाव ९५%


कु. तेजसी संतोष झावरे, वासुंदे ९१%


आयुष प्रतापराव गायकवाड, कान्हुर पठार ९०%


शुभ राहुल लोळगे, निघोज ८७%



कु. मनस्वी राजाराम मुंढे, पिंपळगाव रोठा ८१%


वरद सुर्यभान कोल्हे, वाडेगव्हाण ८०%


कु. साईशा किरण पठारे, वाळवणे ७६%


आयुष अतुल अडसरे, पिंपरी जलसेन ७५%


आयुष बबन खोसे, पाडळी दर्या ७४%


कु. हर्षदा योगेश कामठे, भोयरे गांगर्डा ६०%

## १२ वी कॉमर्स


आदित्य सुधाकर औटी, पारनेर ९२.५%


वरद संजय चत्तर, सिद्धेश्वरवाडी ८२%


कु.तनिष्का विजय खेतमाळस, जामगाव ८१%



## बी.ए.एम.एस.


डॉ. समृद्धी हेमंत नागवडे, रुई छत्रपती


# विद्यार्थी गौरव १२ वी सायन्स – २०२६


सौरभ प्रमोद नरसाळे, गोरेगाव ९१%


वेदांत उदय ठुबे, कान्हुर पठार ९०%


वेदांत गिरीश शिर्के, बाभुळवाडे ८८%


आरूष राहुल जाधव, पाडळी दर्या ८७%


कु. काव्यांजली महेश मातेरे, बाभुळवाडे ८०%


अविनाश विशाल बोरा, पारनेर ७१%


ओंकार निलकंठ खराडे, निघोज ६७%


पार्थ विजय लोंढे, कान्हुर पठार ६५.५%


कु. अद्वैता हरिश्चंद्र नवले, नवलेवाडी ६३%


कु. तनिष्का भगवान चितळकर, रायतळे ६२%


स्वानंद श्रीकांत मातेरे, बाभुळवाडे ६०%


कु. मानस राजेंद्र साबळे, रुई छत्रपती, ५६%

**सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन !**

# रू.५०,०००/- पेक्षा जास्त देणगी देणाऱ्यांचे सत्कार


श्री.विश्वनाथ कोरडे

महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणी - भारतीय जनता पक्षाचे सदस्य व सामाजिक कार्यकर्ते **श्री. विश्वनाथ यादवराव कोरडे,** रा. बाभुळवाडे यांनी मंडळास **रुपये ५१,०००/- (रूपये एक्कावन्न हजार)** देणगी दिली आहे.

**त्यांची एकूण देणगी रू. २,१८,५००/- (रूपये दोन लाख अठरा हजार पाचशे)** झाली आहे.


श्रीम.कुमुदिनी घोडके


**श्रीमती कुमुदिनी दिनकरराव घोडके,** ज्येष्ठ समाजसेविका, सेवानिवृत्त पर्यवेक्षिका, शिक्षण तज्ञ व राष्ट्रीय किर्तनकार रा.कान्हुर पठार यांनी **त्यांचे पती कै. दिनकरराव जनार्दन घोडके** यांचे स्मृतिप्रित्यर्थ मंडळाच्या वसतिगृहारासाठी **रू.१,००,०००/-** (रूपये एक लक्ष) देणगी दिली. त्यांची एकूण देणगी **रू.१,५५,५५०/-** (रूपये एक लक्ष पच्चावन्न हजार पाचशे पन्नास) झालेली आहे.


कै.दिनकरराव घोडके


श्री.प्रशांत आढाव

**श्री.प्रशांत दौलतराव आढाव,** रा. सांगवी सुर्या यांनी त्यांच्या दि.१३.११.२०२५ च्या वाढदिवसानिमित्त **पिताश्री कै.दौलतराव पुनाजी आढाव यांच्या स्मृतीप्रित्यर्थ मंडळास रू.१,००,००१/- (रूपये एक लक्ष एक) देणगी दिली.**

**त्यांची एकूण देणगी रू.१,१५,००१/- (रूपये एक लक्ष पंधरा हजार एक) झाली आहे.**


कै.दौलतराव आढाव

## नांदा सौख्य भरे

- श्री. विलासराव बाळासाहेब ठुबे, रा. पारनेर यांची सुकन्या **सौ. वल्लरी** व श्री. लक्ष्मणराव बबनराव भोसुरे, रा. धानोरे, ता.शिरूर, जि.पुणे यांचे सुपुत्र **चि. आकाश** यांचा शुभविवाह **दि. १.५.२०२६** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त **श्री. विलासराव ठुबे** यांनी मंडळास **रू.११,०००/-** देणगी दिली.
- श्री. रामचंद्र नारायण एरंडे, रा. वडझिरे यांचे सुपुत्र **चि. निरंजन** व श्री. अवधुत पानसे, रा. पुणे यांची सुकन्या **सौ. नेहा** यांचा शुभविवाह **दि. ०३.०५.२०२६** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त **श्री.रामचंद्र एरंडे** यांनी मंडळास **रू.५,०००/-** देणगी दिली.
- **श्री. मिलींद प्रमोद सोबले,** रा. जामगाव यांचे सुपुत्र **चि. शंतनु** व श्री. विश्वास पतंगराव सुर्यवंशी, रा. पलूस, जि.सांगली यांची सुकन्या **सौ. अमृता** यांचा शुभविवाह **दि. ९.५.२०२६** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त **श्री. मिलींद सोबले** यांनी मंडळास **रू.५,०००/-** देणगी दिली.

मंडळाच्या वसतिगृहासाठी आपण स्वतः मदत करा, आपल्या नातेवाईक, मित्रांना मदत करायला सांगा !

- श्री. अरूण भागचंदजी कटारीया, रा. राळेगण थेरपाळ यांचे सुपुत्र **चि. चिराग** व श्री. विष्णुदास पृथ्वीराज दरगड, रा. पुणे यांची सुकन्या **सौ. यशश्री** यांचा शुभविवाह **दि. २०.६.२०२६** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त **श्री. कैलास भागचंदजी कटारीया** यांनी मंडळास **रू.२,०००/-** देणगी दिली.
- श्री. भास्कर बाबुराव चेमटे, रा. वासुंदे यांची सुकन्या **सौ. धनश्री** व श्री. प्रकाशराव गोविंदजी सावंत, रा. अहिल्यानगर यांचे सुपुत्र **चि. चंद्रशेखर** यांचा शुभविवाह **दि. २.७.२०२६** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त **श्री. भास्करराव चेमटे** यांनी मंडळास **रू.५,०००/-** देणगी दिली.
- श्री.संजय गेणू बागडे, रा.हंगे यांचे सुपुत्र **चि. मनिष** व श्री. मनोज खेडकर, रा.पुणे यांची सुकन्या **सौ. राधा** यांचा शुभविवाह **दि. ०४.०७.२०२६** रोजी संपन्न झाला.
- प्रा.बाळकृष्ण गुलाबराव मापारी, रा.राळेगण सिद्धी यांचे सुपुत्र **चि. आदित्य** व श्री. रेवजी गेणू औटी, रा.राळेगण सिद्धी यांची सुकन्या **सौ. निकीता** यांचा शुभविवाह **दि. १९.०७.२०२६** रोजी संपन्न झाला.

# ग्रामस्थ सत्कार



- महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणी – भारतीय जनता पक्षाचे सदस्य **श्री. विश्वनाथ यादवराव कोरडे,** रा. बाभुळवाडे यांना त्यांच्या सामाजिक व शैक्षणिक कार्याच्या योगदानाबद्दल लोकमत परिवाराचा **'लोकमत जनसेवक अवॉर्ड २०२६'** हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.



- कवी, लेखक तथा निवृत्त सहाय्यक वनसंरक्षक **श्री.रामदास गवराम पुजारी** यांना व्हिएटनामची राजधानी हनोई येथे २१.०३.२०२६ मध्ये झालेल्या आंबेडकर विश्व साहित्य संमेलनात त्यांच्या आजवरच्या साहित्य, शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील योगदानाबद्दल जागतिक आबेडकरवादी साहित्य महामंडळातर्फे **'डॉ.बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय साहित्य पुरस्कारा'**ने सन्मानित करण्यात आले. तसेच ११.०४.२०२६ रोजी संघर्ष नायक मिडीया व पँथर आर्मी स्वराज्य क्रांती सेना यांच्या संयुक्त विद्यमाने **'आत्मसन्मान गौरव पुरस्कारा'**ने सन्मानीत करण्यात आले.



- **कु.सानिका धनश्री सुनील झावरे,** रा. भोंद्रे ही डेंटल कॉलेज ऑफ मुंबई इथे चतुर्थ वर्षात शिक्षण घेत आहे. पहिल्या तिन्ही वर्षांमधे ती कॉलेजमध्ये प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाली आहे. तिने **भरतनाट्यम, अरंग्येत्रममधे श्रीगाथा** कार्यक्रम सादर करून **घुंगरू प्रदान आशिर्वाद** घेतले. विशेष खास बाब म्हणजे **जगप्रसिद्ध तिरूपती बालाजी समोर तिने चार मराठी भजने भरतनाट्यम मधे सुमारे ४५ मिनीटे सादर केली.**



- **कु.डॉ.धनश्री भास्कर चेमटे,** रा. वासुंदे हिने **मास्टर ऑफ सायन्स पदवी** आयसर भोपाळ मधून मिळवली व मुंबई आयआयटी व टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च यांच्या संयुक्त विद्यमाने ऑक्टोबर २०२५ मध्ये **नॅनो मटेरीयल सायन्स** या विषयामध्ये तिला **पी.एच.डी.पदवी** प्राप्त झाली. तिच्या नाविण्यपूर्ण संशोधनामुळे तिला जगप्रसिद्ध Rutherford Appleton Laboratory (U.K.) येथे नियुक्ती मिळाली.



- **कु.प्रियांका अंकुश बनकर,** रा. बाबुर्डी या एमपीएससी परीक्षेत उत्तीर्ण झाल्या असून त्यांची **रेव्हेन्यू असिस्टंट क्लास–३** म्हणून नेमणूक झाली आहे.



- **श्री. निरंजन रामचंद्र एरंडे** रा.वडझिरे याना त्यांचा सामाजिक व व्यावसायिक कार्याच्या योगदानाबद्दल सकाळ परिवारा तर्फे **'सकाळ गौरवगाथा यशस्वी तरुणाई २०२६'** हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.



- **डॉ.सौ.नीता नितीन खोडदे,** रा.किन्ही या रयत शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल, वडगाव मावळ येथे कार्यरत असून त्यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची **डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी (पी.एच.डी.)** ही पदवी प्रदान करण्यात आली आहे. 'A study of status of women in Mythological Novels of Amish Tripathi' हा त्यांचा संशोधनाचा विषय होता. महाराष्ट्र राज्याच्या बालभारती या संस्थेच्या इयत्ता ३री व ४थी इंग्लीश विषय पाठ्यपुस्तक निर्मिती तसेच ३री ते १०वी अभ्यासक्रम निर्मिती व एस.सी.ई.आर.टी.च्या त्या सदस्या आहेत.



- **डॉ.सौ.योग्यता संदिप पठारे,** रा. वाळवणे या सिंहगड कॉलेज ऑफ फार्मसी, पुणे येथे सहाय्यक प्राध्यापक या पदावर कार्यरत आहेत. त्यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या **औषध निर्माण शास्त्र शाखेची पीएच्.डी.पदवी** प्रदान करण्यात आली आहे. त्यांचा Development and Characterization of Nanoparticles loaded Ophthalmic Durg Delivery Systems हा विषय होता. त्याचे या संशोधनात एक **भारतीय पेटंट** मंजूर झालेले आहे.



- **प्रा.डॉ. ऋषिकेश हरिभाऊ खोडदे,** रा.गांजीभोयरे हे रयत शिक्षण संस्था लोणंद, जि.पुणे येथे वरीष्ठ महाविद्यालयात कार्यरत असून त्यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातून **नॅनो पार्टिकल** विषयावरील महत्वपूर्ण संशोधन पूर्ण केल्याबद्दल पीएच.डी. ही मानाची पदवी प्रदान करण्यात आली. या त्यांच्या संशोधनामुळे कॅन्सरच्या उपचारांना नवी दिशा मिळाली. डॉ.ऋषीकेश खोडदे यांनी नॅनो तंत्रज्ञान आणि वनस्पतिशास्त्राशी संबंधित विषयावर सखोल अभ्यास, अथक परिश्रम करून **६ पेटंटस् व ४ आंतरराष्ट्रीय पातळीवरील नामांकित शोधनिबंध** असा मानाचा टप्पा गाठला आहे.



- **डॉ. संदीप दिगंबर गाडेकर,** रा.लोणी हवेली हे अध्यापक महाविद्यालय वडगाव मावळ येथे सहयोगी प्राध्यापक आहेत. त्यांची **तळेगाव दाभाडे प्रेस फाउंडेशनच्या सचिव पदी व रोटरी क्लब ऑफ तळेगाव दाभाडे एमआयडीसी, ऑनररी सदस्य पदी निवड** झाली आहे.

# सेवानिवृत्ती



- **श्री.विजय सिताराम ढवळे,** रा. गुणोरे हे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे बांधकाम विभागात उपअभियंता या पदावरून ३३ वर्षे २ महिन्यांच्या सेवेनंतर दि. २८.०२.२०२६ रोजी सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रू.५,०००/–** देणगी दिली.



- **श्री.महादू मळीभाऊ थोपटे,** रा. टाकळी ढोकेश्वर हे पुणे महानगरपालिकेच्या मलनिःसारण विभागामधून उपअभियंता या पदावरून ३१ वर्षांच्या सेवेनंतर दि. ३१.०५.२०२६ रोजी सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रू.२,५००/–** देणगी दिली.



- **श्री.ज्ञानदेव दत्तात्रय बोरूडे,** रा. करंदी हे ज्ञानप्रबोधिनी नवनगर विद्यालय, निगडी येथून लिपीक या पदावरून ३६ वर्षांच्या सेवेनंतर दि.३१.०५.२०२६ रोजी सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रू.१,०००/–** देणगी दिली.



- **श्री.गोरक्ष रंगनाथ तिकोणे,** रा. पाडळी दर्या हे पिंपरी चिंचवड महानगर–पालिकेच्या क्रिडा विभागातून क्रिडी पर्यवेक्षक या पदावरून ३७ वर्षांच्या सेवेनंतर दि. ३१.०५.२०२६ रोजी सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रू.१,१००/–** देणगी दिली.



- **श्री.वसंतराव दत्तात्रय पंदरकर,** रा. पुणे हे भारत सरकारच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण मधून जनरल मॅनेजर (टेक्निकल) या पदावरून ४२ वर्षांच्या सेवेनंतर दि. ३१.०५.२०२६ रोजी सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रू.१०,०००/–** देणगी दिली.



- **प्रा.वसंत दत्तात्रय गाडेकर,** रा.वडझिरे हे पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या मामासाहेब मोहोळ महाविद्यालय, पुणे (व्यावसायिक विभाग) इलेक्ट्रीकल टेक्नॉलॉजी विभागातून **कनिष्ठ व्याख्याता** या पदावरून ३५ वर्षांच्या सेवेनंतर **दि. ३१.०५.२०२६** रोजी सेवानिवृत्त झाले आहेत.



- **श्री.हेमंत अनंत नागवडे,** रा. रूई छत्रपती हे शंभू महादेव ट्रस्टच्या भेकराई माता माध्यमिक विद्यालयात कला शिक्षक या पदावरून ३५ वर्षांच्या सेवेनंतर **दि. ३०.०६.२०२६** रोजी सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रू.५,००१/–** देणगी दिली.

## –: निधन वार्ता :–



- **सौ. सुनंदा दिगंबर गाडेकर,** वय – ६७, रा. लोणी हवेली यांचे दिनांक २४.१२.२०२५ रोजी निधन झाले. त्यांचे स्मृतीप्रित्यर्थ सुपुत्र डॉ.संदीप गाडेकर यांनी मंडळास रु.**२१००/–** रुपये देणगी दिली आहे.



- **दगडू भानुदास चेमटे,** वय ८६, रा. भाळवणी यांचे दि. २७.१२.२०२५ रोजी निधन झाले. त्यांचे स्मृतीप्रित्यर्थ सुपुत्र श्री. सुरेश चेमटे यांनी मंडळास **रू.५,०००/–** देणगी दिली.



- **दत्तात्रय मनोहर विप्रदास,** वय ८६, रा. चिंचोली यांचे दि. २३.३.२०२६ रोजी निधन झाले.



- **आप्पाजी हरीबा कांडेकर,** वय ९७, रा. नारायण गव्हाण यांचे दि. १८.०४.२०२६ रोजी निधन झाले. त्यांचे स्मृतीप्रित्यर्थ सुपुत्र श्री. दत्तात्रय यांनी मंडळास **रू.५,००१/–** देणगी दिली.



- **सावळेराम पाटीलबा पठारे,** वय १०७ वर्षे, रा. राळेगण सिद्धी यांचे दिनांक ११.५.२०२६ रोजी निधन झाले. त्यांचे स्मृतीप्रित्यर्थ सुपुत्र श्री. भगवान यांनी मंडळास **रू. ५,०००/–** देणगी दिली.



- **प्रा. एकनाथ गंगाराम कळमकर,** वय ५७, रा. कळमकरवाडी यांचे दिनांक २७.०६.२०२६ रोजी निधन झाले.



- **पारनेर तालुका मित्र मंडळाच्या** मुलांच्या वसतिगृहाचे व्यवस्थापक, **प्रमोद शंकरराव देशपांडे,** वय ७५, रा. पुणे यांचे दि. २७.०६.२०२६ रोजी निधन झाले.

### पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे
### जमा खर्च पत्रक ०१.०४.२०२५ ते ३१.०३.२०२६

| जमा | रक्कम रू. | रक्कम रू. | खर्च | रक्कम रू. | रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|
| **आरंभीची शिल्लक** | | | **व्यवस्थापन खर्च** | | |
| रोख | ९,५५०.०० | | टायपींग व झेरॉक्स खर्च | २८,३४१.०० | |
| स्टेट बँक - २०७५४ | २९,०६७.२७ | | लिहिणावळ खर्च | २३,०००.०० | |
| सुवर्णयुग सह. बँक - १७७० | ७६,४९१.५५ | | बँक चार्जेस | ३,७९६.८५ | |
| महानगर को-ऑप.बँक ४४५ | ६,०५,७७३.०३ | | ऑफिस खर्च | ४,७६९.०० | |
| महानगर को-ऑप.बँक १६१ | २८,६५६.६७ | ७,४९,५३८.५२ | छपाई खर्च | १५,३००.०० | |
| | | | प्रोफेशनल चार्जेस | ४२,५००.०० | |
| इमारत निधी | | १५,२९,२१४.०० | स्नेह संमेलन खर्च | ५,२७४.०० | |
| | | | स्टेशनरी खर्च | २,४७४.०० | |
| **बँक व्याज** | | | प्रवास खर्च | १२,७७०.०० | १,३८,२२४.८५ |
| मुदत ठेव व्याज खाते | २,२१,६८१.०० | | | | |
| बचत ठेव व्याज खाते | ३,५८२.०० | २,२५,२६३.०० | **उद्देशांवरील खर्च** | | |
| | | | मुलींचे वसतिगृह खर्च | २८,५०७.०० | |
| **इतर जमा** | | | देखभाल व दुरूस्ती खर्च | ५,६४,१९३.०० | |
| फॉर्म फी | ३,४२०.०० | | पगार खर्च | ७,६३,२००.०० | |
| वसतीगृह वीजबील जमा | १,९७,९७२.०० | | सफाई खर्च | २१,७६४.०० | |
| वसतीगृह दंड | ८०,९५३.०० | | इलेक्ट्रीकल खर्च | २५,३८५.०० | |
| वसतीगृह देखभाल शुल्क | १,१०,०००.०० | | वीजबील खर्च | ४,७६,६५२.०० | |
| टी डी एस परतावा व्याज | २,२५१.०० | | उत्सव समारंभ खर्च | २,४४,२५४.०० | |
| अभ्यासिका फी | ६२,५६८.०० | | मुलींचे वसतीगृह गाद्या | ४,२००.०० | |
| किरकोळ जमा | १६९.०० | ४,५७,३३३.०० | इंटरनेट चार्जेस | १,१९,३२६.०० | |
| | | | मासिक छपाई | २१,९००.०० | |
| वसतीगृह शुल्क | | ३१,३२,९५२.०० | पाणी टँकर खर्च | १,८००.०० | २२,७१,१८१.०० |
| | | | पी सी एम सी कर | | १,६८,७७२.०० |
| | | | ऑडिट फी | | ४०,०००.०० |
| | | | किरकोळ खर्च | | १,७२०.०० |
| वसतीगृह अनामत (डिपॉझिट) | | ३,२०,६३६.०० | वसतीगृह अनामत (डिपॉझिट) | | २,९५,६००.०० |
| टी.डी.एस. ठेकेदार | | ९,६५०.०० | टी.डी.एस. ठेकेदार | | १४,९५०.०० |
| मुदत ठेव | | १३,६०,४०७.०० | मुदत ठेव | | ३५,७१,९३९.०० |
| मुदत ठेव व्याज येणे | | ७६,२०७.०० | मुदत ठेव व्याज येणे | | १,६७,७०१.०० |
| टी.डी.एस. २०२४-२०२५ | | ३७,५८९.०० | टी.डी.एस. २०२५-२०२६ | | १८,६५५.०० |
| | | | **मुलींचे वसतिगृह खरेदी** | | |
| | | | फर्निचर | १,६१,७१०.०० | |
| | | | सीसीटीव्ही कॅमेरा | १,३०,४००.०० | |
| | | | अग्नीशामक | १३,०५०.०० | ३,०५,१६०.०० |
| | | | **अखेर शिल्लक** | | |
| | | | रोख | ३१,०७८.०० | |
| | | | स्टेट बँक - २०७५४ | ८३,२३९.२७ | |
| | | | सुवर्णयुग सह. बँक - १७७० | १,५९,६५८.७५ | |
| | | | महानगर को-ऑप.बँक ४४५ | ६,३०,९१०.६५ | ९,०४,८८६.६७ |
| **एकूण रक्कम** | | ७८,९८,७८९.५२ | **एकूण रक्कम** | | ७८,९८,७८९.५२ |

| हौसाराम घोडके | सुनील पोटे | किरण तिकोणे | राजाराम मुंढे | मे.के.बी.साळुंके अँड कं. |
|---|---|---|---|---|
| आजीव अध्यक्ष | अध्यक्ष | उपाध्यक्ष | सेक्रेटरी | लेखा परीक्षक |

## पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

### उत्पन्न खर्च पत्रक ०१.०४.२०२५ ते ३१.०३.२०२६ या कालावधीचे

| खर्च | रक्कम रू. | रक्कम रू. | उत्पन्न | रक्कम रू. | रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|
| **व्यवस्थापन खर्च** | | | **बँक व्याज** | | |
| टायपींग व झेरॉक्स खर्च | २८,३४१.०० | | मुदत ठेव व्याज खाते | २,२१,६८१.०० | |
| लिहिणावळ खर्च | २३,०००.०० | | बचत ठेव व्याज खाते | ३,५८२.०० | २,२५,२६३.०० |
| बँक चार्जेस | ३,७९६.८५ | | | | |
| ऑफिस खर्च | ४,७६९.०० | | **इतर जमा** | | |
| छपाई खर्च | १५,३००.०० | | फॉर्म फी | ३,४२०.०० | |
| प्रोफेशनल चार्जेस | ४२,५००.०० | | वसतीगृह वीजबील जमा | १,९७,९७२.०० | |
| स्नेह संम्मेलन खर्च | ५,२७४.०० | | वसतीगृह दंड | ८०,९५३.०० | |
| स्टेशनरी खर्च | २,४७४.०० | | वसतीगृह देखभाल शुल्क | १,१०,०००.०० | |
| प्रवास खर्च | १२,७७०.०० | १,३८,२२४.८५ | टी डी एस परतावा व्याज | २,२५१.०० | |
| | | | अभ्यासिका फी | ६२,५६८.०० | |
| **उद्देशांवरील खर्च** | | | किरकोळ जमा | १६९.०० | ४,५७,३३३.०० |
| मुलींचे वसतिगृह खर्च | २८,५०७.०० | | | | |
| देखभाल व दुरूस्ती खर्च | ५,६४,१९३.०० | | वसतीगृह शुल्क | | ३१,३२,९५२.०० |
| पगार खर्च | ७,६३,२००.०० | | | | |
| सफाई खर्च | २१,७६४.०० | | | | |
| इलेक्ट्रीकल खर्च | २५,३८५.०० | | | | |
| वीजबील खर्च | ४,७६,६५२.०० | | | | |
| उत्सव समारंभ खर्च | २,४४,२५४.०० | | | | |
| मुलींचे वसतीगृह गाद्या | ४,२००.०० | | | | |
| इंटरनेट चार्जेस | १,१९,३२६.०० | | | | |
| मासिक छपाई | २१,९००.०० | | | | |
| पाणी टॅंकर खर्च | १,८००.०० | २२,७१,१८१.०० | | | |
| पी सी एम सी कर | | १,६८,७७२.०० | | | |
| ऑडिट फी | | ४०,०००.०० | | | |
| किरकोळ खर्च | | १,७२०.०० | | | |
| घसारा इमारत | | १२,४६,५६८.०० | | | |
| घसारा फर्निचर | | १,८०,६४८.०० | | | |
| नफा ताळेबंदास वर्ग | | - | तोटा ताळेबंदास वर्ग | | २,३१,५६५.८५ |
| **एकूण रक्कम** | | ४०,४७,११३.८५ | **एकूण रक्कम** | | ४०,४७,११३.८५ |

**हौसाराम घोडके** — आजीव अध्यक्ष
**सुनील पोटे** — अध्यक्ष
**किरण तिकोणे** — उपाध्यक्ष
**राजाराम मुंढे** — सेक्रेटरी
**मे.के.बी.साळुंके अँड कं.** — लेखा परीक्षक

# मंडळाच्या वसतिगृहासाठी आपण स्वतः मदत करा, आपल्या नातेवाईक, मित्रांना मदत करायला सांगा !


# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

## ताळेबंद पत्रक ३१.०३.२०२६ अखेरचे

| जिंदगी व देणी | रक्कम रू. | रक्कम रू. |
|---|---|---|
| **इतर निधी** | | |
| **इमारत निधी** | | २,८२,२०,३६८.०३ |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | २,६६,९१,१५४.०३ | |
| अधिक जमा - चालू वर्षी | १५,२९,२१४.०० | |
| **घसारा निधी** | | ६८,३९,९५०.०० |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | ५५,९३,३८२.०० | |
| अधिक जमा - चालू वर्षी | १२,४६,५६८.०० | |
| **शैक्षणिक फंड** | | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | | ९६,७२५.०० |
| **अंत्यविधी जमा निधी** | | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | | १,३०,१२२.०० |
| **उत्पन्न खर्च खाते** | | १७,९७,९४४.६४ |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | २०,२९,५१०.४९ | |
| वजा चालू वर्षी तोटा | २,३१,५६५.८५ | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | | ७३,२९४.०० |
| **वसतीगृह अनामत** | | ६,४८,८९२.०० |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | ६,२३,८५६.०० | |
| अधिक जमा - चालू वर्षी | ३,२०,६३६.०० | |
| | ९,४४,४९२.०० | |
| वजा - चालू वर्षी | २,९५,६००.०० | |
| **टी.डी.एस. ठेकेदार** | | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | ६,४००.०० | |
| अधिक वाढ - चालू वर्षी | ९,६५०.०० | |
| | १६,०५०.०० | |
| वजा घट - चालू वर्षी | १४,९५०.०० | १,१००.०० |
| **एकूण रूपये** | | **३,७८,०८,३९५.६७** |

| स्थावर मालमत्ता व येणी | रक्कम रू. | रक्कम रू. |
|---|---|---|
| **स्थिर मालमत्ता** | | ३,१३,७०,०५७.०० |
| **इमारत बांधकाम** | | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | १,८९,५२,४१६.०० | |
| **जमीन** | | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | ८,४५,३११.०० | |
| **मुलींचे वसतिगृह खरेदी** | | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | १,१५,७२,३३०.०० | |
| **जंगम मालमत्ता** | | |
| **फर्निचर व फिक्स्चर** | | ११,२४,६२३.०० |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | १०,८३,१०९.०० | |
| अधिक वाढ - चालू वर्षी | १,६१,७१०.०० | |
| | १२,४४,८१९.०० | |
| वजा घसारा - १० % | १,२०,१९६.०० | |
| **लॅपटॉप** | | ८१७.०० |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | १,३६२.०० | |
| वजा घसारा - ४०% | ५४५.०० | |
| **मोटरपंप** | | ४३७.०० |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | ७२८.०० | |
| वजा घसारा - ४०% | २९१.०० | |
| **सीसीटीव्ही कॅमेरा** | | ७८,२४०.०० |
| चालू वर्षी खरेदी | १,३०,४००.०० | |
| वजा घसारा - ४०% | ५२,१६०.०० | |
| **अग्नीशामक** | | ११,०९२.०० |
| चालू वर्षी खरेदी | १३,०५०.०० | |
| वजा घसारा - १५ % | १,९५८.०० | |
| **प्रिंटर** | | २४६.०० |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | ४१०.०० | |
| वजा घसारा - ४० % | १६४.०० | |
| **सोलर सिस्टीम** | | ७,७२१.०० |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | १२,८६८.०० | |
| वजा घसारा - ४० % | ५,१४७.०० | |
| **वॉटर मीटर** | | २८०.०० |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | ४६७.०० | |
| वजा घसारा - ४० % | १८७.०० | |
| **मुदत ठेव** | | ४०,७१,९३९.०० |
| महानगर बँक RID/२४९/१ ०४५११४ A/c ५२५२७३ | ५,०४,०६७.०० | |
| स्टेट बॅंक ऑफ इंडिया ४३३९०३९६९३७ | ५,३६,०३१.०० | |
| स्टेट बॅंक ऑफ इंडिया ४३६७०२७३०३३ | ४,३१,८४१.०० | |
| स्टेट बॅंक ऑफ इंडिया ४३८९३१५७४५५ | ५,००,०००.०० | |
| स्टेट बॅंक ऑफ इंडिया ४४०२८२९४०८२ | ५,००,०००.०० | |
| स्टेट बॅंक ऑफ इंडिया ४४४०७२६५२३३ | ६,००,०००.०० | |
| स्टेट बॅंक ऑफ इंडिया ४४५२५६५२०८९ | ५,००,०००.०० | |
| स्टेट बॅंक ऑफ इंडिया ४४७५१५७९३४६ | ५,००,०००.०० | |
| **अनामत** | | |
| **एम.एस.ई.बी. डिपॉझिट** | | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | | १०,०००.०० |
| **पी.सी.एम.सी डिपॉझिट (बांधकाम)** | | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | | १०,०००.०० |
| **वृक्ष संवर्धन ठेव** | | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | | ९,०००.०० |
| **पाणी कनेक्शन डिपॉझिट** | | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | | २०,४८५.०० |
| मुदत ठेव व्याज येणे | | १,६९,९१७.०० |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | ७८,४२३.०० | |
| अधिक येणे - चालू वर्षी | १,६७,७०१.०० | |
| | २,४६,१२४.०० | |
| वजा आले - चालू वर्षी | ७६,२०७.०० | |
| टि.डि.एस. २०२५-२०२६ | | १८,६५५.०० |
| **रोख व बँक शिल्लक** | | |
| रोख | ३१,०७८.०० | |
| स्टेट बँक - २०७५४ | ८३,२३९.२७ | |
| सुवर्णयुग सह. बँक - १७७० | १,५९,६५८.७५ | |
| महानगर को-ऑप.बँक ४४५ | ६,३०,९१०.६५ | ९,०४,८८६.६७ |
| **एकूण रूपये** | | **३,७८,०८,३९५.६७** |

| **हौसाराम घोडके** | **सुनील पोटे** | **किरण तिकोणे** | **राजाराम मुंढे** | **मे.के.बी.साळुंके अँड कं.** |
|---|---|---|---|---|
| आजीव अध्यक्ष | अध्यक्ष | उपाध्यक्ष | सेक्रेटरी | लेखा परीक्षक |




## -: विशेष सूचना :-

- ☺ मंडळाचे विद्यार्थी वसतिगृह सुरु असून विद्यार्थ्यांना वसतिगृहात प्रवेश देणे सुरु आहे.
- ☺ पुरस्कार, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, उद्योगधंदा, नोकरीतील बढती तसेच सेवानिवृत्तीची तारीख या संबंधात आपल्या किंवा आसपासच्या पारनेर तालुक्यातील व्यक्तींची फोटोसहीत माहिती कळवावी.
- ☺ आपल्या मुलामुलींच्या तसेच नातेवाईकांच्या शुभविवाहाची बातमी संवादमध्ये छापली जाते. त्याकरीता एक लग्नपत्रिका मंडळाच्या पत्त्यावर पाठवावी किंवा फोनने कळवावे.
- ☺ आपल्या नातेवाईकांचे दुःखद निधन झाल्यास मंडळास अवश्य कळवावे. जेणेकरून इतरसुद्धा आपल्या दुःखात सहभागी होतील.
- ☺ विद्यार्थ्यांच्या १०वी, १२वी, इंजिनियरींग, मेडीकल व इतर सर्व शाखांचे परीक्षांचे मार्क्स कळविल्यास व फोटो पाठविल्यास सदर विद्यार्थ्यांचे अभिनंदन ‘संवाद’ मधून करण्यात येईल.
- ☺ कृपया घरचा, नोकरीचा बदललेला पत्ता व फोन नंबर त्वरीत कळवावा.



संपादकीय पत्ता :
**इंजि.डॉ.विजयकुमार ठुबे**
ए-६०५, ‘‘शुभकल्याण’’ नांदेड सिटी,
सिंहगड रोड, पुणे ४११०४१.
मो.: ९४२२०२६२२५

ही पत्रिका पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे साठी प्रकाशक श्री.सुनील कुंडलीक पोटे व मुद्रक श्री.सुनील मुरलीधर तोटे (suniltote11@gmail.com) (M: 9823415531) यांनी मे.चैतन्य एंटरप्रायजेस, ६२५, नारायण पेठ, पुणे ४११०३० येथे छापून ‘पारनेर भवन’, मंगलनगर, गल्ली नं.८, वाकड रोड, डांगे चौक, थेरगाव, पुणे - ४११०३३ येथून फक्त सभासदांसाठी प्रसिद्ध केली.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखांशी अथवा मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

**बुक - पोस्ट**
(छापील मजकूर)

Website :
http://www.parnermitramandalpune.com/

श्रीमान ____________________
____________________
____________________
____________________

पत्रव्यवहाराचा पत्ता :
**श्री. हौसाराम घोडके**
**आजीव अध्यक्ष,** पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे
ए-१/१, यशोधन सोसा., चिंतामणी नगर भाग-२,
बिबवेवाडी, पुणे ४११ ०३७. मो.: ९४२०६९६७९०